नि.फौ.प्र.२७/२०१९
शासन—वि—शंकर
नि.क्र.३२

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ यांची जबानी :—
मी याव्दारे शपथेवर कथन करते की —
माझे नांव :— लिंगण्णा गौरण्णा आवारीवार
वय :— ५९ वर्षे, धंदा :—शेती
राहणार:— बोरीपिंपरी, ता. केळापूर, जि. यवतमाळ.

**सरतपासणी सरकारतर्फे जे. एम. तुगनायत विशेष सहा. सरकारी वकील.**

मी आरोपीस आणि फिर्यादीला ओळखतो कारण तो माझया गावातील रहिवासी आहे. मला पोलीसांनी पंचनाम्याची कार्यवाही करण्यासाठी बोलाविले नव्हते. पोलीसांनी फक्त माझी सही घेतली होती. पोलीसांनी आमच्यासमक्ष घटनास्थळ पंचनाम्याची कार्यवाही केली नव्हती. आता मला दाखविण्यात आलेल्या घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. माझया सहीला **नि.क्र.३३** देण्यात येत आहे.

**साक्षीदार सरकारी पक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीत विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.**

दिनांक १२/१२/२०१८ रोजी मौजा पिंपरी येथे फिर्यादी यांच्या कोठयासमोर सिमेंट रस्त्यावर घटनास्थळ पंचनामा करणेकामी बोलाविले होते, हे म्हणने खरे नाही. घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते, हे म्हणने खरे नाही. घटनास्थळ पंचनामा माझयासमक्ष पोलीसांनी लिहिला होता व मी त्यावर वाचून सही केली होती, हे म्हणने खरे नाही. फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केलेला होता, हे म्हणने खरे नाही. तो पंचनामा आम्हाला वाचून दाखविला व त्यानंतर त्यावर मी सही केली होती, हे म्हणने खरे नाही. मी आरोपीला वाचविण्याकरिता खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास आरोपीचे वकील श्री शेख साहेब यांच्याद्वारा :**

**नाकारला.**

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले —समक्ष—

Digitally signed by Ravi Magan Giri Date: 2019.11.08 11:57:46 +0530

Digitally signed by Ravi Magan Giri Date: 2019.11.08 11:57:53 +0530

**(आर. एम. गिरी)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(कोर्ट न.१) केळापूर.

**(आर. एम. गिरी)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(कोर्ट न.१) केळापूर.

**दिनांक ०७/११/२०१९.**

नि.फौ.प्र.२७/२०१९
शासन—वि—शंकर
नि.क्र.२९

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची जबानी :—
मी याव्दारे शपथेवर कथन करते की —
माझे नांव :— गजानन दत्तात्रय गंडतवार
वय :— ३५ वर्षे, धंदा :—कृषि केंद्र
राहणार:— पाटणबोरी, ता. केळापूर, जि. यवतमाळ.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे जे. एम. तुगनायत विशेष सहा. सरकारी वकील.</u>**

मी आरोपीस ओळखतो कारण तो माझया गावातील रहिवासी आहे. घटना चार पाच महिन्यापूर्वी ग्राम पिंपरीबोरी येथे शिवमंदिरजवळ घडली होती. सकाळी माझया मालकीची मॅक्स गाडी जी की मी शिवमंदिरापाशी रात्री लावलेली होती, सुरू करण्यासाठी गेलो असता ती सुरू झाली नाही. पाहणी केली असता गाडीमध्ये बॅटरी दिसून आली नाही. मला आरोपीवर संशय आला म्हणून मी त्याच्याविरूद्ध पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे जावून तक्रार दिली. अजून कोणाचे काय चोरी गेले होते हे मला माहित नाही. मी फक्त माझया मॅक्स गाडीतील एक्साईड कंपनीची बॅटरी चोरी गेल्याबददल तक्रार दिली होती. तक्रार दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली. फिर्यादवर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्याद निशाणी **<u>३०</u>** वर आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली. छापील फिर्यादवर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. छापील फिर्याद निशाणी **<u>३१</u>** वर आहे. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. ज्या ठिकाणावरून गाडीमधून बॅटरी चोरीला गेली होती ते ठिकाण पोलीसांना दाखवितांना मी हजर नव्हतो.
सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीचे वकील श्री शेख साहेब यांच्याद्वारा :**

मी गाडीचे आणि बॅटरीच्या मालकी हक्काचे कागदपत्रे मी पोलीसांना तक्रार देतेवेळी किंवा त्यानंतर दिलेले नाही. मी पोलीस ठाण्यात गेलो आणि फक्त एक्साईड  कंपनीची बॅटरी चोरीला गेली आहे एवढीच तक्रार दिली होती, हे म्हणने खरे आहे.  मी चोरी करणा—याचे नाव तक्रारीमध्ये सांगितले नाही हे म्हणने खरे आहे.  तक्रारमध्ये पोलीसांनी काय लिहून घेतले होते हे मला माहित नाही, हे म्हणने खरे आहे.  मी पोलीस ठाण्यात एकदाच गेलो आणि त्यानंतर पुन्हा गेलेलो नाही, हे म्हणने खरे आहे.  त्यावेळेस माझया चार पाच को—या कागदपत्रावर पोलीसांनी सहया घेतल्या होत्या, हे म्हणने खरे आहे.  घटनास्थळ हे मी पोलीसांना दाखविले नव्हते, हे म्हणने खरे आहे. आरोपीस चोरी करतांना मी स्वत:     प्रत्यक्षात बघितलेले नाही, हे म्हणने खरे आहे. प्रकरणातील जप्त मुददेमाल हा माझया मालकीचा नाही.  सरतपासातील आरोपीविरूद्धचा सर्व मजकूर मी खोटा सांगितला हे म्हणने खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले

Digitally signed by Ravi Magan Giri
Date: 2019.11.08 11:58:02 +0530

**(आर. एम. गिरी)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(कोर्ट न.१) केळापूर.

—समक्ष—

Digitally signed by Ravi Magan Giri
Date: 2019.11.08 11:58:09 +0530

**(आर. एम. गिरी)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(कोर्ट न.१) केळापूर.

**दिनांक ०७/११/२०१९.**